# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:31.12.2025** **वार:बुधवार**

---

•२०२५ मध्ये विविध क्षेत्रांमध्ये अभूतपूर्व सुधारणांमुळं देशाच्या विकास प्रवासाला गती मिळाली - पंतप्रधानांचं प्रतिपादन

•महाराष्ट्रातल्या 29 महानगरपालिका निवडणुकीच्या उमेदवारी अर्जाची उद्या छाननी

•बांगलादेशच्या माजी पंतप्रधान खालिदा झिया यांच्यावर आज ढाक्यात अंत्यसंस्कार; परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर उपस्थित राहणार

आणि

•महिला क्रिकेटमध्ये श्रीलंकेविरुद्ध 20 षटकांचा पाचवा आणि अंतिम सामना जिंकून मालिकेत भारताचं निर्भेळ यश

**<u>पंतप्रधान</u>**

२०२५ मध्ये विविध क्षेत्रांमध्ये अभूतपूर्व सुधारणांमुळं देशाच्या विकास प्रवासाला गती मिळाली असून विकसित भारत निर्माण करण्याच्या प्रयत्नांना या सुधारणांमुळं बळकटी मिळेल, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. भारतानं रिफॉर्म एक्सप्रेसमध्ये प्रवेश केला असून संपूर्ण जगाचं लक्ष वेधून घेतलं आहे असं पंतप्रधानांनी म्हंटलं आहे. सरत्या वर्षाला निरोप देताना, समाज माध्यमावर त्यांनी काल एक संदेश प्रसारित केला.

**<u>पंतप्रधान</u>**

आगामी केंद्रीय अर्थसंकल्पाच्या पार्श्वभूमीवर, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल नवी दिल्लीत काही प्रमुख अर्थतज्ञ आणि विविध क्षेत्रांमधल्या तज्ज्ञांचे विचार जाणून घेण्यासाठी नीती आयोगाच्या कार्यालयात संवाद साधला. जागतिक क्षमता निर्मिती आणि जागतिक एकात्मता निर्मितीसाठी आवश्यक सुधारणा करण्याच्या गरजेवर पंतप्रधानांनी भर दिला. दीर्घकालीन विकास टिकवून विविध क्षेत्रांमध्ये सुधारणा आणण्याचं आवाहन त्यांनी केलं. या बैठकीत देशाची सध्याची आर्थिक स्थिती आणि भविष्यातले प्राधान्यक्रम, यावर तज्ज्ञांनी आपला दृष्टिकोन आणि मूल्यमापन याबद्दल आपलं मत सामायिक केलं.

**<u>उपराष्ट्रपती</u>**

काशी आणि तामिळनाडू यांच्यातील संबंध केवळ ऐतिहासिक नसून त्यामध्ये एक सखोल सांस्कृतिक आणि आध्यात्मिक सातत्य आहे, त्यामुळं हजारो वर्षांपासून भारताला एकत्र जोडलं आहे,असं प्रतिपादन

उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन यांनी केलं. ते काल रामेश्वरम इथं आयोजित काशी तामिळ संगमच्या समारोप समारंभात बोलत होते. महाकवी सुब्रमण्यम भारती यांचा उल्लेख करत उपराष्ट्रपतींनी सांगितलं की,काशी तामिळ संगम हे एकात्म, संघटित आणि आत्मविश्वासपूर्णभारतीय दृष्टिकोनाचं प्रतिबिंब असून अशा देवाणघेवाणीमुळं  राष्ट्रीय एकात्मतेची भावना अधिक दृढ होते

**पीएम-युवा**

युवा लेखकांना मार्गदर्शन करण्यासाठी, पीएम युवा योजनेच्या तिसऱ्या टप्प्यातल्या विजेत्यांची घोषणा काल करण्यात आली. इंग्रजीसह एकंदर २२ भारतीय भाषांमधल्या ४३ विजेत्यांचा यात समावेश आहे. मराठीसाठी दिव्यांशू सिंग, अंबादास मेव्हाणकर आणि प्रसाद जाधव या लेखकांचा विजेत्यांमध्ये समावेश आहे. सर्व विजेत्यांच्या संकल्पनांचं पुस्तकात रुपांतर करण्यासाठी या लेखकांना सहा महिन्यांचं मार्गदर्शन आणि दर महिन्याला ५० हजारांची शिष्यवृत्ती मिळणार आहे. याशिवाय पुस्तक प्रसिद्ध झाल्यावर आयुष्यभरासाठी १० टक्के रॉयल्टीही दिली जाणारआहे.

**अमित-शहा**

पश्चिम बंगाल सरकार, सीमेवर कुंपण घालण्यासाठी जमीन देण्याऐवजी घुसखोरांना जमीन देण्यास प्राधान्य देत असल्याचा आरोप केंद्रीय गृहमंत्री आणि भाजपचे ज्येष्ठ नेते अमित शहा यांनी केला. नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी पोर्ट ब्लेअर इथं आझाद हिंद ध्वज फडकावल्याच्या ८० व्या जयंतीनिमित्त कोलकाता इथं आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी शहा यांनी महिलांच्या सुरक्षिततेबद्दल आणि बंगालमधून औद्योगिक स्थलांतराबद्दल चिंता व्यक्त केली. राज्याचे हरवलेले वैभव परत मिळवून देण्यासाठी आणि त्याच्या महान प्रतिष्ठित व्यक्तींची स्वप्ने पूर्ण करण्यासाठी भाजपला संधी देण्याचं त्यांनी लोकांना आवाहन केलं.

**रेल्वे-विद्युतीकरण**

भारतीय रेल्वेनं सकलेशपूर-सुब्रमण्य रोड घाट विभागाचं विद्युतीकरण पूर्ण करून एक मोठा अभियांत्रिकी टप्पा गाठला आहे. हा विभाग भारतीय रेल्वेमार्गावरील सर्वात कठीण आणि तांत्रिकदृष्ट्या आव्हानात्मक भूभागांपैकी एक आहे. रेल्वे मंत्रालयाने म्हटले आहे की, या प्रकल्पामुळे या प्रदेशात रेल्वे जोडणी, कार्यक्षमता तसंच शाश्वतता सुधारेल. आता वंदे भारत गाडी या मार्गावरून मंगळुरूपर्यंत धावू शकेल, असं रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी या यशाच्या परिणामाबाबत भाष्य करताना म्हंटलं आहे.

**महाराष्ट्र-निवडणूकसमग्र**

महाराष्ट्रातल्या 29 महानगरपालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याचा काल  शेवटचा दिवस होता. अर्जांची छाननी आज होईल. 2 जानेवारीपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येतील. 3 जानेवारीला निवडणूक चिन्हाचं वाटप होईल आणि अंतिम उमेदवार यादी प्रसिद्ध होईल. येत्या 15 जानेवारीला मतदान होणार असून 16 जानेवारीला मतमोजणी होणार आहे.  दरम्यान काल उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या अखेरच्या दिवसापर्यंत अनेक ठिकाणी युती, आघाडी, उमेदवारी यादी यांचं चित्र स्पष्ट झालं नव्हतं.

**<u>नववर्ष- बंदोबस्त</u>**

नववर्षाच्या स्वागतासाठी महाराष्ट्रासह देशात सर्वत्र, विशेषतः तरुणाईमध्ये उत्साह पहायला मिळत आहे. पर्यटन स्थळ पर्यटकांनी फुलून गेली आहेत. नवीन वर्षांचं आगमन साजरं करण्यासाठी शहरातही अनेक जण घराबाहेर पडतात. या पार्श्वभूमीवर विविध शहरात वाहतूक पोलिसांनी आज चोख बंदोबस्त ठेवला आहे. अनेक ठिकाणी ड्रोनच्या माध्यमातून लक्ष ठेवण्यात येणार असून मद्यपी वाहनचालकांची तपासणी सुरू आहे. वाहतुकीच्या नियमांचं उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करण्यात येत आहे.

**<u>सोशलमीडिया</u>**

अश्लील, बाल लैंगिक शोषणाशी संबंधित मानसिक आजाराचं चित्रण असलेल्या अथवा अन्य स्वरूपातल्या बेकायदा आशयाविरोधात कारवाई न करणारे ऑनलाईन प्लॅटफॉर्म आणि सोशल मीडिया कंपन्यांविरोधात कायदेशीर कारवाई केली जाईल असा इशारा केंद्र सरकारनं दिला आहे. इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयानं याबाबतच्या मार्गदर्शक सूचना जारी केल्या. सोशल मीडिया कंपन्यांनी आपल्या अनुपालन चौकटीचा तात्काळ आढावा घ्यावा, आणि आपल्या प्लॅटफॉर्मवरच्या अश्लील आणि बेकायदा आशयाविरोधात कारवाई करून तो त्वरित काढून टाकावा, असं यात म्हटलं आहे.

**<u>एनसीसी</u>**

राष्ट्रीय छात्र सेना-एनसीसीचं प्रजासत्ताक दिन शिबिर कालपासून नवी दिल्लीत सुरु झालं. सर्वधर्म पूजेपासून सुरू होणारं हे शिबीर महिनाभर चालणार आहे. एनसीसीचे महासंचालक लेफ्टनंट जनरल वीरेंद्र वत्स यांनी कॅडेट्सचं स्वागत केलं आणि प्रजासत्ताक दिन शिबिरासाठी निवड झाल्याबद्दल त्यांचं अभिनंदन केलं. यंदा प्रजासत्ताक दिनाच्या संचलनात २८ राज्यं आणि आठ केंद्रशासित प्रदेशांमधले चोवीसशे हून अधिक छात्र सहभागी होणार आहेत. सहभागींची ही आतापर्यंतची सर्वाधिक संख्या असल्याचं मंत्रालयाने सांगितलं आहे. युवा देवाणघेवाण कार्यक्रमांतर्गत या वर्षी २५ मैत्रीपूर्ण देशांमधले कॅडेट्स आणि अधिकारी देखील या सोहळ्यात सहभागी होणार आहेत.

**<u>खालिदा-झिया</u>**

परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर ढाका इथं आज बांगलादेशच्या माजी पंतप्रधान आणि बीएनपी अध्यक्षा खालिदा झिया यांच्या अंत्यसंस्काराला उपस्थित राहणार आहेत. दुपारी २ वाजता राष्ट्रीय संसद भवनाच्या दक्षिण प्लाझा आणि ढाका इथल्या माणिक मिया अव्हेन्यू इथं अंत्यसंस्कार होतील. दक्षिण तसंच आग्नेय आशियातील अनेक देशांचे प्रतिनिधी अंत्यसंस्काराला उपस्थित राहण्याची अपेक्षा आहे. बांगलादेशच्या पहिल्या महिला पंतप्रधान खालिदा झिया यांचं काल ढाका इथं वयाच्या ८० व्या वर्षी निधन झालं.

**<u>बुद्धिबळ</u>**

दोहा इथं सुरू असलेल्या जागतिक ब्लिट्झ चॅम्पियनशिप स्पर्धेत काल ग्रँडमास्टर अर्जुन एरिगाइसीला उपांत्य फेरीत उझबेकचा अव्वल खेळाडू नोदिरबेक अब्दुसत्तोरोव्हविरुद्धच्या पराभवामुळं कांस्यपदकावर

समाधान मानावं लागलं. गतविजेता मॅग्नस कार्लसननं दुसऱ्या उपांत्य फेरीत अमेरिकेच्या फॅबियानो कारुआनाला ३-१ असं पराभूत करून अंतिम फेरीत प्रवेश केला आहे.

**<u>क्रिकेट</u>**

महिला क्रिकेटमध्ये काल रात्री तिरुअनंतपुरम इथं झालेल्या 20 षटकांच्या पाचव्या आणि शेवटच्या आंतरराष्ट्रीय सामन्यात भारतानं श्रीलंकेचा १५ धावांनी पराभव केला. हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील भारतीय संघानं या मालिकेत ५-० असं निर्भेळ यश मिळवलं.

प्रथम फलंदाजी करताना भारतानं निर्धारित २० षटकांत ७ खेळाडू गमावून १७५ धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल, १७६ धावांच्या आव्हानासमोर श्रीलंकेला निर्धारित २० षटकांत सात खेळाडू गमावून १६० धावा करता आल्या.

तत्पूर्वी, पाहुण्या संघानं नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. हरमनप्रीत कौरला सामनावीर घोषित करण्यात आलं, तर शेफाली वर्मा मालिकावीर ठरली.

**<u>हवामान</u>**

भारतीय हवामान विभागानं, जम्मू आणि काश्मीर, लडाख, गिलगिट-बाल्टिस्तान आणि मुझफ्फराबाद इथं आज जोरदार बर्फवृष्टीचा अंदाज वर्तवला आहे. दिल्लीसह देशाच्या उत्तरेकडील राज्यांमध्ये दाट धुक्याचा इशारा जारी करण्यात आला आहे. हिमाचल प्रदेश, कर्नाटकचा काही भाग आणि तेलंगणात आज थंडीची लाट येण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. अंदमान आणि निकोबार बेटे, तामिळनाडू, पुद्दुचेरी, कराईकल आणि पश्चिम राजस्थानमध्ये वीजांसह जोरदार वाऱ्यांचा इशारा देण्यात आला आहे.

दरम्यान दिल्लीतील इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर काल दृश्यमानता कमी असल्यानं सुमारे ११८ विमाने रद्द करण्यात आल्याचे विमानतळ प्रशासनानं सांगितलं. दिल्लीला जाणाऱ्या सुमारे २५ रेल्वे गाड्याही काल ३ तासांपेक्षा जास्त उशिरानं धावल्या.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपल, नमस्कार